# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क./आयसीसी/२०१८–१९/०9
दिनांक – 24 मे, २०१८

परिपत्रक :–

सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन संस्था, औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र, इत्यादी महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त पदव्युत्तर संस्था तसेच विद्यापीठातील विविध विभागांचे व संस्थांचे विभाग प्रमुख/संचालक यांना कळविण्यात येते की, शासन निर्णय क्र. टीईएम–२०१८/प्र.क्र.३५/ताशि–४ दिनांक ३१ मार्च, २०१८ नुसार मान्यताप्राप्त व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिकणा–या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीसाठी पालकांची उत्पन्न मर्यादा रूपये ६.०० लाखावरून वार्षिक रूपये ८.०० लाख करण्याबाबत आदेश निर्गमित केलेले आहेत.

उपरोक्त शासन निर्णयानुसार उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारितील मान्यता प्राप्त अभ्यासक्रमामध्ये केंद्रीभुत प्रवेश पध्दतीने अथवा विहित पध्दतीने प्रवेश घेणा–या (व्यवस्थापन कोटा/संस्था स्तरावरील प्रवेश वगळून) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देण्यासाठी विद्यार्थ्यांच्या दोन्ही पालकांची एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रूपये ६.०० लाखावरून रूपये ८.०० लाख करण्यास शासनाची मान्यता देण्यात आली असुन संबंधित शासन निर्णयातील तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

वरिल शासन निर्णय विद्यापीठाच्या mu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(डॉ. दिनेश कांबळे)
प्रभारी कुलसचिव

माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी –

सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन संस्था, औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र, इत्यादी महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त पदव्युत्तर संस्था आणि विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभाग प्रमुख/संचालक.

(डॉ. दिनेश कांबळे)
प्रभारी कुलसचिव

८।४।७८

PA to VC

UNIVERSITY OF MUMBAI
16 APR 2018
1374

मान्यताप्राप्त व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिकणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीसाठी पालकांची उत्पन्न मर्यादा रुपये ६.०० लाखावरुन वार्षिक रुपये ८.०० लाख करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र.टीईएम-२०१८/प्र.क्र.३५/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.
दिनांक : ३१ मार्च, २०१८

PVC
24.4.18
Ag. VC

संदर्भ : १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक टीईएम-२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४, दिनांक १३/१०/२०१६

२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दिनांक ०७/१०/२०१७

३) शासन निर्णय, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, क्रमांक ईबीसी-२०१७/प्र.क्र.२७/शिक्षण, दिनांक ०१/०१/२०१८

DR/Sp. Cell

प्रस्तावना :-

राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित व शासन मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती,भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून रुपये ६.०० लाखावरुन रुपये ८.०० लाख करण्यास विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाने संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. त्याच धर्तीवर आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये ६.०० लाखावरुन रुपये ८.०० लाख इतकी करण्यात यावी, असा निर्णय मराठा मोर्चाच्या मागण्यांसंदर्भात स्थापन करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीने दिनांक ०२/०१/२०१८ च्या बैठकीत घेतला आहे. तसेच मंत्रिमंडळ उपसमितीच्या दिनांक १४/०२/२०१८ च्या बैठकीत समितीने दिलेल्या निदेशानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग आणि कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग या सर्व विभागांतर्गत असलेल्या मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांमध्ये शिकणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ

देण्यासाठी प्रस्तुतची वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये ६.०० लाखावरुन रुपये ८.०० लाख इतकी करण्यासाठी एकत्रित प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग आणि कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग यांच्या अखत्यारितील मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांना विहित पध्दतीने / केंद्रिभूत प्रवेश पध्दतीने प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये ६.०० लाखावरुन रुपये ८.०० लाख करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :- उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग आणि कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग यांच्या अखत्यारितील मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांमध्ये केंद्रीभूत प्रवेश पध्दतीने अथवा विहित पध्दतीने प्रवेश घेणाऱ्या (व्यवस्थापन कोटा / संस्था स्तरावरील प्रवेश वगळून) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देण्यासाठी विद्यार्थ्यांच्या दोन्ही पालकांची एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रुपये ६.०० लाखावरुन रुपये ८.०० लाख करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. या योजनेचा लाभ शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून लागू राहिल.

३. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दिनांक ७/१०/२०१७ यामधील अटी व शर्ती याकरीता लागू राहतील.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र. २४१/१८/व्यय-५, दिनांक २६.०२.२०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३११९४७०२८८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Madan Maruti Morve

(म. मा. मोरवे )

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई



२५००२८-१३

२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव (कृषी), कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सचिव (प.दु.म.) कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
११. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
१२. सर्व सन्माननीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य
१३. मा.मंत्री, महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे खाजगी सचिव
१४. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
१५. मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव
१६. मा.मंत्री, कृषी यांचे खाजगी सचिव
१७. मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे खाजगी सचिव
१८. मा.मंत्री, सहकार, पणन व वस्त्रोद्योग यांचे खाजगी सचिव
१९. मा.मंत्री, कामगार, भूकंप पुनर्वसन, कौशल्य विकास, माजी सैनिकांचे कल्याण यांचे खाजगी सचिव
२०. मा.मंत्री, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय यांचे खाजगी सचिव
२१. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
२२. मा.राज्यमंत्री, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय यांचे खाजगी सचिव
२३. मा.राज्यमंत्री, कृषी यांचे खाजगी सचिव
२४. मा.राज्यमंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव
२५. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२६. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२७. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२८. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२९. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३०. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३१. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३२. आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे
३३. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई

३४. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३५. संचालक, पशु संवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
३६. कुलगुरु, सर्व विद्यापीठे
३७. कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.माणगांव, जि.रायगड
३८. कुलगुरु,महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
३९. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
४०. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४१. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
४२. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
४३. सर्व जिल्हाधिकारी
४४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
४५. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
४६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
४८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
४९. सह सचिव (विशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई.
५०. उप सचिव (मशि/अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
५१. अवर सचिव (तांशि-3/ विशि-3), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
५२. कक्ष अधिकारी (मशि-२/मशि-४/तांशि-५/तांशि-६/साशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई
५३. उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व कार्यासने.
५४. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक
५५. निवडनस्ती/तांशि-४